# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, वसमत रोड,
परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : १. शासन निर्णय परिवि/२७१५/प्र.क्र.३०२ दिनांक २९.०२.२०१६.
२.विद्ययापीठ परिपत्रक दिनांक १८.११.२०२०.
३. विद्यापीठ पत्र दिनांक १३.०३.२०२४.
४. अवर सचिव कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.न्यायप्र-१६१९/प्र.क्र.१३५/६-अे दि. ९.८.२०२४.

विद्यापीठ जाहीरात दि. २६.८.२००९ च्या अनुषंगाने दाखल विशेष अनुमती याचिका क्र.१७५९७-१७६००/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचेपरिविक्षाधीन कालावधीचा निपटारा करण्याकरीता परिपुर्ण प्रस्ताव सादर करणे बाबत.

## परिपत्रक

जा.क्र.२०२४/प्र.क्र.१/आस्था-८/13860
दिनांक १३.०८.२०२४.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत प्रकल्पग्रस्तांची विशेष भरती जाहीरात दिनांक २६.०८.२००९ प्रसिध्द केली होती. सदर जाहिरातीच्या मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१३३०/२०१४ मध्ये दिलेल्या न्याय निर्णयावर शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.१७५९७-१७६००/२०१७ मधील न्याय निर्णयाच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यात आलेल्या आहेत.

सदरील नियुक्त्या हया न्यायालयात प्रकरण प्रलंबीत असल्यामुळे संदभीय क्र.२ वरील परिपत्रकान्वये कर्मचाऱ्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आल्यानंतरही त्यांच्या परिविक्षाधिन कालावधीचा निपटारा करण्यात आलेला नाही. प्रकरणी विशेष अनुमती याचिका क्र.१७५९७-१७६००/२०१७ मध्ये प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८.४.२०२३ रोजी निकाल घोषीत करून शासने दाखल केलेली मागणी फेटाळून मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र.१३३०/२०१४ या प्रकरणामध्ये दिनांक

Scanned by CamScanner

४.९.२०१७ रोजी दिलेला निकाल कायम ठेवलेला आहे. याबाबत विद्यापीठ पत्र दिनांक १३.३.२०२४ नुसार शासनाचे मार्गदर्शन मागीतले होते. त्यावर संदर्भीय क्र.४ वरील पत्रान्वये प्रस्तुत जाहिरातीनुसार नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी नियमीत करण्याचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

त्यामुळे आता या परिपत्रकाद्वारे विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालय प्रमुख /आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येत आहे की, सदरील कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधिन कालावधीचा निपटारा करण्यासाठी परिपुर्ण प्रस्ताव सोबतच्या **परिशिष्ट-१** नुसार या कार्यालयास जलदगतीने सादर करण्यात यावेत. तसेच यापुर्वी ज्या कर्मचाऱ्यांचे परिविक्षाधिन कालावधीचा निपटारा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, अशा कर्मचाऱ्यांचे सुध्दा प्रस्ताव पुनश्च: सादर करण्यात यावेत.

**मा. कुलगुरु महोदय, यांच्या मान्यतेने,**

13.08.2024

(संतोष सि.वेणीकर)

**कुलसचिव**

**प्रतिलिपी : माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१. मा.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

२. मा.संचालक संशोधन, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी .

३. मा.संचालक विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

४. मा.सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

५. विद्यापीठ अभियंता/ नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

६.सर्व कार्यालय प्रमुख /अहरण व संवितरण अधिकारी ------------------------------------------- यांना योग्य त्या कार्यवाहीस्त.

प्रत

१. उप कुलसचिव (साप्रवि)कुलसचिव कार्यालय,वनामकृवि,परभणी

२. प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

३. मा. कुलगुरु महोदय, याचे सचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

४. आस्था-१/२, आस्था३/४, आस्था-५/६ कार्यासन कुलसचिव कार्यालय, वनामकृवि परभणी.

Scanned by CamScanner

C- 603

परिशिष्ट-१

| अ.क्र. | तपासणीचे मुद्दे/बाबी | तपशील | शेरा (से.पु.पृ.क्र.) |
|---|---|---|---|
| | नाव, पदनाम व कार्यालय | श्री. | |
| १ | नियुक्ती आदेश क्रमांक व दिनांक | विद्यापीठ आदेश---<br>दिनांक ----- | |
| २ | रुजू दिनांक | दिनांक --- | |
| ३ | वैद्यकीय तपासणी झाली आहे काय? असल्यास प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक | होय.<br>जि.श. चिकीत्सक, --- यांचे प्रमाणपत्र क्र. ---<br>/ दिनांक --- | |
| ४ | चारित्र्य पडताळणी झाली आहे काय? असल्यास प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक | पोलीस निरीक्षक --- यांचे पत्र क्र.---<br>दिनांक -- | |
| ५ | नियुक्ती मागास प्रवर्गातून असल्यास जात प्रमाणपत्र पड्ताळणी झाली आहे काय? असल्यास प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक | खुला/ लागु आहे की नाही<br>असल्या जात प्रमाणपत्रा क्रमांक-----<br>दिनांक ----- | |
| ६ | संगणक परिक्षा उत्तीर्ण/सूट | एमएससी आयटी उत्तीर्ण क्रमांक-----<br>महिना ---- व वर्ष ---- लिहावे | |
| ७ | मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सूट | विद्यापीठ आदेश क्र.२०२३/-------<br>, दि.--------- अन्वये सूट. | |
| ८ | हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सूट | | |
| ९ | सेवा पडताळणी | दिनांक ---------- ते -------- | |
| १० | मुल्यांकन अहवालाची प्रतवारी<br>(प्रतवारी किमान ५० इतकी असणे आवश्यक) | दि.--------<br>दि.-----------<br>दि. -----<br>दि.--------<br>एकुण प्रतवारी = ----- | |
| ११ | गोपनीय अहवालाची प्रतवारी<br>(प्रतवारी किमान ब/ गुणांकन किमान ४ किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक) | १. दि.-------<br>२. दि. ------<br>३. दि. ------<br>४. दि. ------ | |
| १२ | परिविक्षाधीन कालावधीत रजा उपभोगल्या असल्यास रजेचा तपशील व त्यामुळे परिविक्षाधीन कालावधीत होत असलेली वाढ (दिवसामध्ये) | १.दि.----- ते दि.--- -- - --- दिवस--<br>२.दि.----- ते दि.--- - --- दिवस-<br>एकूण ---- दिवस अर्जित ---कारणास्तव | |
| १३ | नियुक्ती आदेशा संदर्भात मा. न्यायालयामध्ये प्रकरण सुरू आहे काय? असल्यास त्याचा थोडक्यात तपशील. | नाही./आहे<br>असल्यास तपशिल लिहावा | |
| १४ | परिविक्षाधीन कालावधीदरम्यान शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू/ प्रलंबित आहे काय? असल्यास थोडक्यात तपशील. | नाही./आहे<br>असल्यास तपशिल लिहावा | |
| १५ | प्रस्ताव विहीत कालावधीत (तीन महिन्याच्या आत) सादर करण्यात आला आहे काय? नसल्यास त्याबाबतची कारणे / खुलासा मागविण्यात आला आहे काय? सदर खुलासा समाधानकारक आहे काय? | नाही./आहे<br>असल्यास तपशिल लिहावा | |
| १६ | दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचा दिनांक | दिनांक --------- (म.नं.) | |
| १७ | परिविक्षाधिन कालावधी समाप्त करुन विद्यापीठ सेवेत कायम करण्याचा दिनांक | रजेचा कालावधी धरुन परीविक्षाधिन पुर्ण होत असल्याचा दिनांक ------------ | |

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

Scanned by CamScanner